हेल्प लाईन नं: ८४८४ ९१३५५३ / ८४८ ४९१३५५४

Online Website : www.pmaypmrda.in

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

प्रधानमंत्री आवास योजना (नागरी)

सर्वांसाठी गृहनिर्माण

# Beneficiary Led 'Individual House' Construction or Enhancement (BLC)

## '' वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान ''

Housing Department
Government of Maharashtra

**लाभधारक योजनेच्या खालील घटकांकरिता लाभ प्राप्त करु शकतात. :**

नवीन बांधकाम

विद्यमान घराचे विस्तारीकरण

लाभार्थी नेतृत्व (वैयक्तिक घर) बांधकाम किंवा विस्तारिकरण (बीएलसी) ची वृत्त वैशिष्ट्ये बांधकामाच्या प्रगतीचा घराची भौगोलिक स्थिती दर्शविणाऱ्या छायाचित्रांनी मागोवा घेणे.

**पात्रता**

**नवीन बांधकामाकरिता :**

१) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक असलेले नागरी रहिवासी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (वार्षिक उत्पन्न रुपये ३ लाख पर्यंत)

२) भारतात कोठेही लाभार्थी कुटुंबाच्या मालकीचे पक्के घर असता कामा नये.

३) लाभार्थी झोपडपट्टीत किंवा झोपडपट्टी बाहेरील परिसरात राहत असतील.

४) झोपडपट्टी पुर्नविकास न झालेल्या आणि घर कच्चे किंवा अर्धवट पक्के असलेल्या लाभार्थिंचा या घटकांमध्ये समावेश होऊ शकतो.

**लाभ :**

● ज्यांना मिशनच्या इतर घटकांचा लाभ घेणे शक्य झाले नाही. अशी आर्थिक दृष्या दुर्बल श्रेणीतील वैयक्तिक पात्र कुटुंब स्वत:च नवीन घर बांधू शकतात किंवा विद्यमान घराचे विस्तारीकरण करु शकतात.

● अशा कुटुंबाना मिशन अंतर्गत नवीन घर बांधण्याकरिता किंवा विद्यमान घराचे विस्तारिकरण करण्याकरिता केंद्राकडून रुपये १.५० लाख व महाराष्ट्र शासनातर्फे रुपये १ लाख इतके सहाय्य मिळू शकते.

**नागरी स्थानिक संस्थांमार्फत अंमलबजावणी :**

● यांतर्गत सहाय्य प्राप्त करु इच्छिणाऱ्या लाभार्थींनी त्याच्या मालकीच्या जमिनीची उपलब्ध असलेली पुरेशी कागदपत्रे घेऊन नागरी स्थानिक संस्थाकडे जावे

● नागरी स्थानिक संस्था लाभार्थिंनी दिलेली माहिती आणि त्यांनी सादर केलेली घराच्या बांधकामाची योजना यांचे सत्यापन करतील जेणे करुन जागेची मालकी आणि इतर तपशील जसे की लाभार्थिंची आर्थिक स्थिती आणि पात्रता याबाबी निश्चित करता येईल.

● संभाव्य लाभार्थ्यांच्या घराची स्थिती जसे की कच्चे, अर्धे कच्चे इत्यादीची तपासणी भारताच्या सामाजिक आर्थिक आणि जाती निहाय जगगणनेच्या माहितीनुसार (एसईसीसी डेटा) केली जाईल आणि परिणामी लाभार्थ्यांची नवीन घर बांधण्याची पात्रता निश्चित केली जाईल.

● एसईसीसी माहितीमधील किती खोल्या, कुटुंब सदस्याची तपशीलवार माहिती इत्यादी बाबी तपासून लाभार्थ्यांची घर विस्तारीकरणाची पात्रता निश्चित करण्यात येईल.

● या अर्जाच्या आधारे, अशा सर्व वैयक्तित लाभार्थ्यांकरिता नागरी स्थानिक संस्था संपूर्ण शहराकरिता एक व्यापक विस्तृत गृहनिर्माण प्रकल्प तयार करुन शहर विकास आराखड्यानुसार (सीडीपी-सिटी डेव्हल्पमेंट प्लॅन) किंवा अन्य कोणत्याही योजनानुरुप या प्रस्ताविक घरांचे बांधकाम नगर नियोजनाच्या नियमानुसार होईल तसेच योजनेची अंमलबजावणी एकात्मिकपणे करेल.

● या सहाय्याकरिता वैयक्तिक अर्जदाराचा विचार केला जाणार नाही, असे प्रकल्प राज्यपातळीवरील मंजूरी तसेच देखरेख समितीकडून (एसएलएसएमसी) मंजूर करण्यात येतील.

● वैयक्तिक गृह बांधणीकरिता मंजूरी देतांना नागरी स्थानिक संस्था आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश यांनी नियोजित घराच्या बांधकामाकरिता लाभार्थ्याला आवश्यक तो निधी विविध स्त्रोतातून उपलब्ध होईल याची खातरजमा करावी, या स्त्रोतामध्ये लाभार्थ्याचे स्वत:चे योगदान भारत शासनाचे सहाय्य, राज्यसरकारचे सहाय्य इत्यादीचा समावेश असेल. कोणत्याही प्रकरणामध्ये बांधकामासाठीच्या आवश्यक उर्वरित खर्चाची तजवीज झालेली नसल्यास भारत शासनाची मदत उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. अन्यथा कदाचित केवळ भारत शासनाच्या मदतीने अर्धवट बांधलेली घरे निर्माण होतील.

● अशा वैयक्तिक घराच्या बांधकामाकरिता राज्य/केंद्रशासित प्रदेश किंवा नगर यांनी देखील योगदान द्यावे. राज्य/केंद्रशासित प्रदेश यातील नागरी स्थानिक संस्था/अंमलबजावणी करणारी संस्था यांनी शिफारस केलेल्या प्रकल्पाच्या लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये केंद्रशासनाच्या सहाय्य जमा करण्यात येईल.


● जरी केंद्रशासनाचा निधी राज्यशासनाकडे या घटकाच्या सहाय्याच्या रक्कमेसहित एकरकमी देण्यात येत असला तरी राज्यसरकार घराच्या बांधकामाच्या प्रगतीरुप ३-४ टप्प्यामध्ये सदर आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देईल.

● नागरी स्थानिक संस्थेने जमिनीची कागदपत्रे, मंजूर आराखडा आणि जागेची प्रत्यक्ष तापसणी केल्यानंतर लाभार्थ्यांसोबत बांधकामाची रुपरेषा आणि देयक टप्पे याबाबतचा करार करावा.

# चित्रातील भाग उदाहरण




राष्ट्रीय बांधकाम संहितेनुसार (एनबीसी) कमीतकमी चटई क्षेत्र




## प्रधानमंत्री आवस योजना (नागरी) अंतर्गत मान्य विस्तारीकरणाची उदाहरणे





मंजूरी:होय
कारण: सर्व निकष पूर्ण करत आहे

मंजूरी:नाही
कारण: प्रस्तावित विस्तारिकरण ९ चौ.मी. पेक्षा कमी आहे.


मंजूरी:होय
कारण: सर्व निकष पूर्ण करत आहे.

मंजूरी:नाही
कारण: विस्तारिकरणात कमीत कमी एक खोली वाढविणे अनिवार्य आहे.




मंजूरी: नाही
कारण: प्रस्तावित विस्तारिकरण कमीत कमी ९ चौ.मी. इतके असणे अनिवार्य आहे.

मंजूरी: होय
कारण: सर्व निकष पूर्ण करित आहे.




समजा तळमजल्यावर पुरेशी जागा नसेल, तर पहिल्या मजल्यावर देखील विस्तारीकरण केली जाऊ शकते, तथापि बांधकाम संरचनेची सुरक्षितता सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

# दाखविलेली उदाहरणे प्रमाणात नाहीत.

✲ लाभार्थी स्वत:चा निधी किंवा अन्य कोणताही निधी वापरून बांधकामाची सुरुवात करु शकतो आणि केलेल्या बांधकामाच्या प्रमाणात केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून निधी देण्यात येईल.

- शासनाच्या सहाय्याची शेवटची ५०,००० रुपये रक्कम घराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर देण्यात येईल.

- अशा वैयक्तीक घरांच्या बांधकामाच्या प्रगतीचा मागोवा घराची भौगोलिक स्थिती दर्शविणाऱ्या छायाचित्रांनी घेणे, जेणे करुन प्रत्येक घराच्या कामावर प्रभावीपणे लक्ष ठेवता येईल.
- लाभार्थी नेतृत्व बांधकाम (बीएलसी) घटकांतर्गत घराच्या बांधकामाच्या विविध टप्प्यावर भौगोलिक स्थिती दर्शकाच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट लाभार्थी हस्तांतरण (डिबीटी डिरेक्ट बेनिफिशिअरी ट्रान्सफर) अन्वये निधी हस्तांतरीत करणे अनिवार्य आहे.

**विस्तार का ?**


- नागरी घरांची कमतरता (२०१२-२०१७) च्या तांत्रिक गटानुसार ८०% घरे ही दाटीवाटीत आहेत.
- दाटीवाटीत घटकाची व्याख्या करतांना प्रत्येक विवाहीत जोडप्याला राहण्यास स्वतंत्र खोली नसणे अशा घरांची टक्केवारी होय.

**प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) संबंधित तरतूदी मार्गदर्शक तत्वे :**

प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) च्या कलम ७.२ (ब) अनुसार मार्गदर्शक तत्वे :

''जर लाभार्थ्यांकडे २१ चौरस मीटर क्षेत्राचे पक्के घर असेल किंवा अर्धे पक्के घर असेल, ज्यामध्ये एखाद्या सुविधेचा अभाव असेल (जसे की खोली स्वयंपाक घर, शौचालय, न्हाणीघर किंवा यांच्यापैकी कोणतेही संयोजन), ते विस्ताराकरिता घेतले जाऊ शकते तथापि असे गृह विस्तारीकरण घेतले जाऊ शकते तथापि असे गृह विस्तारीकरण नागरी स्थानिक संस्था/राज्य यांनी घराच्या संरचना सुरक्षेची सुनिश्चित करणे आणि खालील अटीशर्तींच्या आधीन राहील.

## Urban Housing Shortage 2012




१) विस्तारीकरणाच्या पश्चात एकूण चटई क्षेत्रफळ २१ चौरस मीटर पेक्षा कमी आणि ३० चौरस मीटरपेक्षा जास्त असता कामा नये.

२) विस्तारीकरण म्हणजे विद्यमान घरामध्ये किमान ९ चौरस मीटर चटई क्षेत्रफळाची भर तसेच राष्ट्रीय बांधकाम संहितेनुसार (एनबीसी) एक तरी राहण्यायोग्य खोली किंवा स्वयंपाकघरासहित खोली आणि/किंवा शौचालय असणे आवश्यक आहे.

३) प्रधानमंत्री आवास योजनेची (नागरी) मार्गदर्शक तत्वे प्रस्ताविक ७ ड परिशिष्टामध्ये लाभार्थी नेतृत्व बांधकाम घटकाच्या अंतर्गत विस्तारिकरण प्रस्तावाबद्दल तपशीलवार माहिती देईल.

✲ परिशिष्ट २५ मे २०१६

**प्रधानमंत्री आवास योजनेतील (नागरी) विस्तारीकरण घटकांतर्गत लाभ प्राप्त करु शकणाऱ्या लाभार्थ्यांची स्पष्टीकरणात्मक यादी**

- २१ चौ.मी. क्षेत्रफळाचे विद्यमान घर असलेले आर्थिक दुर्बल घटक श्रेणीतील लाभार्थी.
- कुटुंब जेथील विवाहीत पुत्राला स्वतंत्र खोली नाही.
- एकत्र कुटुंबे जेथे एकापेक्षा अधिक कुटुंबे दाटीवाटीने एकाच घरात राहत आहेत, ते मोकळ्या जागेत किंवा उभा विस्तार करुन अतिरिक्त खोली/घर बांधून घराचे विस्तारीकरण करु शकतील.

✲ प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत लाभार्थी केवळ एकाच घटकाचा लाभ प्राप्त करु शकतात
✲ अनुदान/सबसिडी/सहाय्यक प्रत्येक घटकामध्ये उपलब्ध आहे.


Additional Chief Secretary
Housing Department Government Maharashtra 3rd Floor, Mantralya, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai - 400032
E-mail: psec.housing@maharashtra.gov.in

REPL
The Power of Knowledge
Consultants: Beneficiary Led Construction (BLC)
Rudrabhishek Enterprises Ltd.
(An ISO 9001:2008 Certified Company)
A-6, Sec-58, Noida, U.P.-201301